# वारंवार विचारण्यात येणारे प्रश्न

* **ईपरमिशन अंतर्गत कोणत्या विविध प्रकारच्या वाहीन्या टाकण्यास परवानगी देण्यात येते ?**

- दुरध्वनी वाहीनी
- विद्युत वाहीनी
- ओ.एफ.सी. – नेटवर्क
- पाण्याची पाईप लाईन
- गॅस पाईप लाईन
- पेट्रोल पाईप लाईन

* **मैत्री व सा.बां. विभागाचे संकेतस्थळावरील ईपरमिशन आज्ञावली मध्ये काय फरक आहे ?**

मैत्री व सा.बां. विभागाचे संकेतस्थळावरील ईपरमिशन आज्ञावली सारखीच आहे. अर्जदार कुठल्याही संकेतस्थळावरून अर्ज करू शकतो.

* **लॉगीन कसे तयार करावे ?**

सा.बां. विभागाचे www.mahapwd.com संकेतस्थळ अथवा मैत्री संकेतस्थळाला भेट द्या. ईपरमिशन वर क्लिक करा तद्नंतर "Enroll Now" वर क्लिक करा. ई-मेल आयडी हा लॉगीन आयडी असेल, हे कृपया लक्षात घ्यावे.

* **अर्जाची सद्यस्थिती कोण सांगेल** ?

अर्जाची सद्यःस्थिती अर्जदाराच्या सदर ई-मेल आयडीवर आज्ञावलीतुन स्वयंचलित ईमेलव्दारे कळविण्यात येते.

* **इंटेशन फॉम म्हणजे काय व ईपरमिशन आज्ञावली अंतर्गत त्याचे काय महत्व आहे ?**

इंटेशन फॉम हे फार महत्वाचे दस्तऐवज आहे. इंटेशन फॉम अंतर्गत अर्जदाराचे नाव व पत्ता,संबंधित रस्त्याचे नाव,जिल्हा इ. बाबी असतात. त्या जतन करून परवानगीच्या पत्रावर नमुद असतात आणि जे बदलविता येऊ शकत नाही.

* **इंटेशन फॉम मध्ये एडिट सुविधा आहे का ?**

इंटेशन फॉम सेव्ह केल्यानंतर अर्जदार इंटेशन फॉम विषयक उद्धृत केलेली माहिती बघू शकतो व त्यामध्ये एडिट करू शकतो. मात्र सेव्ह केल्यानंतर व पुढचा टप्पावर पोचल्यानंतर कोणालाच इंटेशन फॉम मध्ये बदल करता येऊ शकत नाही.

* **इंटेशन फॉम मध्ये रस्त्याचे नाव व जिल्हा चे काय महत्व आहे ?**

ई परमिशन ची पूर्ण प्रक्रीया या बाबींवर आधारीत असल्यामुळे इंटेशन फॉम मध्ये रस्त्याचे नाव व जिल्हा अचुक नमुद असणे आवश्यक आहे.

* **इंटेशन फॉम मध्ये कोणकोणते दस्तावेज द्यावे लागतात ?**

१. वाहीन्या टाकण्याचे ऑथरायजेशन पत्र

२. ऑथेटीकेशन पत्र

३. स्थानीक प्रतिनिधीचे स्कॅन केलेले ओळखपत्र ( पॅन कार्ड / आधार कार्ड )

* **नियम, प्रक्रिया व आवश्यक दस्तऐवज इ. बाबतची सर्व माहिती कोण पुरविणार ?**

संबंधित विभागीय कार्यालयातील विविध प्रकारच्या वाहीन्या टाकण्यास परवानगीबाबत काम करणारे कर्मचारी,अधिकारी परवानगीसाठी असलेले नियम, त्याची प्रक्रिया व आवश्यक दस्तऐवज इ. बाबतची सर्व माहिती उपलब्ध करून देतील. तसेच संबंधित शासन निर्णय , युजर म्यॅन्युअल इ. संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

* **ई परमिशन अंतर्गत ई-मेल आयडी चे महत्व काय आहे ?**

अर्जदाराचा ई-मेल आयडी हा आज्ञावलीमध्ये जतन करून ठेवल्या जातो. ई परमिशन प्रक्रियेची सद्य:स्थिती अर्जदाराच्या सदर ई-मेल आयडीवर आज्ञावलीतुन स्वयंचलित ईमेलव्दारे कळविण्यात येते.

* **ई-मेलचे कार्यान्वयन म्हणजे काय ?**

उपभोक्ता जेंव्हा स्वतःच्या ई-मेल आयडीवरून आज्ञावलीमध्ये क्रियाशील होतो, त्यावेळी आज्ञावलीतुन स्वयंचलित ई-मेल हे त्याच्या ई-मेल आयडीवर पाठविण्यात येतो. सदर ई-मेल हा कार्यान्वयनासाठी तपासून घेणे व ई-मेलचा पत्ता बरोबर आहे, याची खात्री करून घेण्यासाठी गरजेचा आहे. ई-मेलचे कार्यान्वयन फार महत्वाचे आहे, कारण सर्व प्रकारचा संवाद हा ई-मेल वरच विसंबून आहे.

* **आज्ञावलीमध्ये दस्तऐवज अपलोड करण्याची कमाल मर्यादा काय आहे ?**

कोणताही दस्तऐवज आज्ञावलीमध्ये अपलोड करण्याची कमाल मर्यादा २.० एमबी आहे.

* **संयुक्त तपासणीची तारीख कोणाद्वारे प्रदान केली जाते ?**

संयुक्त तपासणीची तारीख संबंधित विभागीय कार्यालयाद्वारे प्रदान केली जाते. उपरोक्त तारीख स्वयंचलित ईमेलव्दारे अर्जदारास कळविण्यात येते. त्यामुळे संयुक्त तपासणीची तारीख आढळून न आल्यास संबंधित विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

* **संयुक्त तपासणीचे काय महत्व आहे ?**

संयुक्त तपासणी ही अर्जदार आणि संबंधित विभागीय कार्यालयाच्या प्रतिनिधी समवेत केली जाते. या प्रक्रीयेमध्ये तांत्रिक बाबी , वाहीनी टाकण्याची व्यवहार्यता तपासल्या जाते. विभागीय कार्यालयाचे प्रतिनिधी त्याच दिवशी अर्ज भरून स्वाक्षरीसह अर्जदारास देतो. हा भरलेला अर्ज, अर्जदार ऑनलाईन अर्ज करीताना अपलोड करीतो.

* **संयुक्त तपासणीकरीता कोणकोणते दस्तावेज सोबत न्यावे लागतात ?**

संयुक्त तपासणीकरीता रिक्त अर्ज सोबत न्यावा लागतो. अर्जाचा नमुना आपल्या लॉगीन मध्ये दिल्या जातो.

* **या आज्ञावलीत महत्वाचा मुद्या कोणता आहे ?**

अर्जदार स्वतः रस्ता पुर्ववत करणार आहे की सा.बां. विभागाद्वारे करणार हा या आज्ञावलीतील महत्वाचा मुद्या आहे. कृपया पर्याय काळजीपुर्वक निवडावा.

*     **परवानगी शुल्काचे भुगतान कधी करावे ?**

अर्जदाराच्या ई-मेल आयडीवर आज्ञावलीतुन स्वयंचलित ईमेलव्दारे परवानगी शुल्काचे भुगतानबाबत कळविण्यात येते. अर्जदारास हा ई-मेल प्राप्त झाल्यानंतर त्याने स्वतःच्या आयडीवर कृपया लॉगीन करावे व परवानगी शुल्काचे भुगतान करावे.

*     **ई परमिशन आज्ञावली अंतर्गत ऑनलाईन पेमेंटची सुविधा उपलब्ध आहे का ?**

ई परमिशन आज्ञावलीमध्ये क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड, नेटबँकीग, NEFT इ. माध्यमातून भुगतान करण्याच्या सुविधा सद्यःस्थितीत उपलब्ध आहेत.

*     **ऑनलाईन पेमेंट करतांना अडचण उद्‌भवल्यास संपर्क कुठे करावा ?**

ऑनलाईन पेमेंट करतांना अडचण उद्‌भवल्यास कृपया आज्ञावलीमध्ये असलेले **"Contact us"** पान तपासावे. सदर पानामध्ये दूरध्वनी क्र., ई-मेल आयडी इ. बाबी विस्तृतपणे उपलब्ध आहेत.

*     **ई परमिशन आज्ञावली अंतर्गत परवानगी पत्राची प्रत कशी प्राप्त करावी ?**

संबंधित प्राधिकृत अधिकारी अर्जास मंजुरी प्रदान करतील. तद्‌नंतर अर्जदाराने परवानगी शुल्काचे ऑनलाईन भुगतान केल्यानंतर , सा.बां. विभागाचे संबंधित विभागीय कार्यालय परवानगी पत्र देतील.

*     **Help Desk** (मदत कक्ष ) सोबत संपर्क कधी साधावा ?

Help Desk (मदत कक्ष ) हे आज्ञावली तसेच Web शी संबंधित सर्व बाबी हाताळत/न्याहाळत असतात. सर्व शासकीय कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते संध्याकाळी ५.३० वाजेपर्यंत Help Desk (मदत कक्ष ) सोबत संपर्क साधु शकतात.

**इतर कुठल्याही संबंधित माहितीसाठी, कृपया आम्हास itccnagpur@gmail.com या ई-मेल पत्त्यावर वर ई-मेल करावा.**

**हा दस्तऐवज सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांची मिळकत आहे आणि महाराष्ट्र शासनाकरीता इलेक्ट्रॉनीक परमिशन सिस्टीमअंतर्गत फक्त संदर्भाच्या हेतुने उपभोक्ताव्दारे उपयोग केला जावा.**